नि.फौ.ख.क्र.१५१/२००७

१ सरकार वि. अखिल खान

निशाणी क्र. ८

**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक २ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – संजय फुलचंद पटले

वय – ४६ वर्ष, व्यवसाय – खाजगी नोकरी

राहणार – आनंद नगर, कामठी, जि. नागपूर

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री.एस.जी.इंगळे यांच्यातर्फे**

१. पोलीसांनी माझ्या समक्ष आरोपीच्या ताब्यातून चाकू (भाजी कापण्याची छूरी) जप्त केला नव्हता. मला घटनेबाबत काहीही माहिती नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अनुक्रमांक २ वर माझी सही आहे. सहिपुरत्या भागास **निशाणी क्र.९** देण्यात येते. त्यातील मजकुर मला माहित नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षाने उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०१.०५.२००७ रोजी पोलीस स्टेशन कामठी येथे आरोपीच्या ताब्यातून चाकू (भाजी कापण्याची छूरी) जप्त केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष जप्तीपंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला वाचून दाखवून त्यावर सही घेतली होती. हे म्हणेणे खरे नाही की मी आरोपीला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण**

**सदर साक्षीदाराचा पुरावा फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २९९ अन्वये नोंदविण्यात आला करीता उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा/–

ठिकाण –कामठी **(क्यु.आर. सय्यद)**

दिनांक –०६/१०/२०२५ प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.